# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. अंजली श्रीपाद रानडे

---

मन मंदिरात आराध्या ची आराधना करतात संगीतातील अनमोल स्वर ।
पूर्व पुण्याई अशी की, आळवता आळवता कमाल करतात सूर ।
जीवनाच्या रंगभूमीवर।
आकाशाच्या मांडवा खाली ।
स्वर साधनेची पूजा बांधली ।
चराचर प्रफुल्लित होत सरसावली।।
सरस्वती मातेस विराजमान करण्या सज्ज जाहले हृदय स्थान ।
सूर,ताल,लय,ठेक्याने चरणस्पर्श करीत छेडली तान ।।
सप्तसुरांची होता मर्जी।
सप्त लोक ही ताल धरती ।
सप्त रंगात न्हाऊन जगती ।
जयघोषाच्या जल्लोषात सुखावती ।।
अंतर्नाद घुमता, स्वर निनादती।
चराचरात साद प्रतिसाद घुमती ।
सागर तीरी लाटांचा गाज ।
स्वरांना शोभतो सुंदर साज ।।
वायु संगे रंगबिरंगी निसर्गाची सुरेल तान ।
मधुर गंधात सरमिसळून स्वरांची असते शान ।
नभो मंडळात सप्तरंगाने धरलाय विशेष ताल ।
संधी काळी दिनकराची मोहक  दिसते धमाल ।।
स्वानंदात सुखद हिंदोळ्यावर असते संगीताची शान ।
मधुर गाणी गाता पौर्णिमा बहरावी छान छान।
चंद्र चांदण्यांचे आभाळभर नयनसुख अनुभवावे ।
मनमोहक बिंब प्रतिबिंबाच्या ताल ठेक्यात  सुमुख फुलावे ।।
मनात शब्द गुणगुणता, प्रतिसाद घुमतो ।
ताल ठेक्यात,ब्रह्मानंदी टाळीचा स्वर मिसळतो ।।
सर्वत्र खेळ चाललाय लीलेचा, सुंदर संगीताचा ।
सवंगड्यांसह कट्टा रंगलाय आनंदात आवडीनिवडी चा।।

Arihant Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

एकमेकांच्या संगती,अनुबंधाचे नाजूक धागे जुळती ।
आपोआप स्वरधारा कोसळता, स्वानंदात चिंबचिंब होती ।।
काय वर्णावा तो स्वरानंद ।
आनंदाचे डोही आनंद तरंग ।
दाद देता देता भरुन पावे ।
ऐकणाऱ्या ने तृप्त व्हावे ।।
अक्षरमाला सुगंधा सवे शब्द गुंफिती ।
स्वर जुळताच रागात आळविती।
अनुरागात स्वर मधुरतेत निनादती
अशा शरद पौर्णिमा जीवनात रंग भरती।।
प्रत्येक पौर्णिमेचा थाट  वेगळा।
क्षणोक्षणी प्रहरांना राग निराळा ।
रस,गंधाचा  स्वाद ही विरळा ।
श्रोत्यांना खिळवणारा स्वर आगळा ।।
चराचरात चैतन्य भरतो सुखद पावा ।
भावविभोर गोप गोपी घेती मागोवा।
राधा सवे कृष्ण पाहता निनादती ।
नामा सवे गुंजारव घुमतो जगती ।।
स्वर तालवृंदांचा थाट संगीत पूजनात
साधक जयघोष करतात  मुक्त स्वरात ।
टाळ वीणेसवे नाम गजरात।
नृत्य साकारले पद झंकारात।।
निरनिराळ्या प्रहरी रागांसवे ।
नादमयतेत चराचर गुंग होते ।
सप्त सूरच घडवतात असे चमत्कार।
निरोगी, निकोप जीवनाचे किमयागार ।।
जीवनात संगीताची संगती।
सुखानंदाचा मार्ग दाखवती ।
निराशा, उद्विग्नता दूर सारी ।
आयुष्याला देते नूतन उभारी ।।
बेसूर झालेल्यांना सामंजस्याचे स्वर लावले ।
तालासुरात जीवन गाणे गायचे पक्के केले ।
मुक्त कंठाने मनभर खावे,प्यावे, गावे ।
आठवणींच्या नादात तालात स्वस्वरुपी रहावे ।।

Anahat Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

सप्त सुरांना हृदयी कवटाळले ।
पूर्व पुण्याईने च फळ प्राप्त झाले।
ताल सुरांच्या प्रसादाने मन संतोषले ।
आराध्याच्या आशीर्वचनांनी तृप्त झाले ।।
सुगंधी स्वरमाला कंठी घालता तन मोहरले।
स्वर, तालवाद्य कानी गुंजले, मधुरतेत घोळले ।
मधुर गंधासवे सहस्रधारा अखंड स्रवणार ।
मुक्त कंठाने स्वानंदात सहज  राग आळवणार ।।
श्रद्धा भक्ती च्या अनुपम संगमावर
संजीवन
गीत गाता गाता
तरुन
भवसागर पार जाणार
ही भावसुमनांजली नतमस्तक होऊन चरणी अर्पण करणार

Anahat Music Therapy